नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०९/२०२५ ( बुधवार )

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता काटोल पोलीस स्टेशन अंतर्गत काढण्यात आला रूट मार्च

**पोलीस स्टेशन काटोल :—** आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवाचा बंदोबस्त असल्याने काटोल पोलीस स्टेशन अंतर्गत सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ०३/०९/२०२५ रोजी रूट मार्च घेण्यात आला. नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन काटोल ते अंबालाल पटेल बिल्डिंग, दुर्गा चौक शास्त्री चौक नेहरू बाजार मेन रोड डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक हत्तीखाना अण्णाभाऊ साठे नगर परिषद शाळा क्रमांक २ , पोलीस स्टेशन काटोल पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री रंजित सिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल, यांच्यासह पोलीस स्टेशन काटोल, पोलीस स्टेशन नरखेड, पोलीस स्टेशन कोंढाळी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथील अधिकारी अंमलदार असे एकुण १० अधिकारी, १ एस. आर. पी. एफ. पथक, १ आर. सी. पी. पथक, १०० अंमलदार, २६ गृहरक्षक,तसेच ५ सरकारी वाहने यांचा समावेश होता


जय हिंद !
कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी
पथसंचलन
स्टेशन काटोल
जिल्हा ग्रामीण




## पोलीस ठाणे अर्जुनी जि. धंमतरी राज्य छत्तीसगढ येथील जबरी चोरी व खुनाच्या गुन्हयातील संशयीत आरोपीस मौदा पोलीसांनी केले अटक

दिनांक ०३/०९/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, पोलीस ठाणे मौदा यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे अर्जुनी जि. धंमतरी राज्य छत्तीसगढ येथील अप क्र. १२६/२०२५ कलम १०३(१),३०९(६), ३३१(८), ३(५) भारतीय न्याय संहीता मधील संशयीत आरोपी नामे मेघनाथ उर्फे महेश राजकुमार शाहु हा जबरी चोरी व खुन करून धंमतरी येथुन जिल्हा गोंदिया, भंडारा व नागपुर मार्गे पळुन जात आहे. अशी माहीती मिळाल्याने श्री सारीन दुर्गे यांनी पोलीस ठाणे, मौदा येथील पोलीस हवलदार प्रणयसिंह बनाफर ,पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते, पोलीस अंमलदार शुभम ईश्वरकर यांना सदर घटनेची माहीती देवुन रवाना केले. नमुद

पोलीस पथक मौदा हद्दतीत संशयीत आरोपीचा शोध घेत असता अंदाजे वेळ १६/०० वा. आसोली शिवार नाग नदी जवळ भंडारा कडुन नागपूर कडे जाणारी संशयीत निळ्या रंगाची टाटा सफारी कार क्रमांक सि.जी ०४ क्यु ई ९१६० ही येतांनी दिसली. मौदा पोलीस पथकाने नमुद कारला थांबविण्याचा ईशारा केला असता सदर कार चालक पोलीसांना पाहुन कार न थांबविता नागपूर कडे पळुन जात असतांना पोलीसांनी शिताफिने कारला थांबवुन विचारपुस केली असता आरोपी हा उडवाउडवीचे उत्तर देत होता. त्यावरून त्यांचे आधार कार्ड तपासुन संशतीय इसम मेघनाथ उर्फे महेश राजकुमार शाहु हाच असल्याबाबत खात्री झाल्याने आरोपीस ताब्यात घेतले. सदर आरोपी नामे मेघनाथ उर्फे महेश राजकुमार शाहु, वय २५ वर्ष, रा. जुना धंमतरी,ता. बखाना जि. धंमतरी यांस पुढील गुन्हाचे तपास कामी पोलीस ठाणे अर्जुनी जि. धंमतरी राज्य छत्तीसगढ यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन अरोली येथे आयोजित करण्यात आले रक्तदान शिबीर

दिनांक ०३/०९/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या संकल्पनेतुन तसेच श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन अरोली चे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत आणि पोलीस स्टेशन अरोली चे अधिकारी आणि अंमलदार यांनी संतकृपा मंगल कार्यालय, अरोली येथे पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील पोलीस पाटील, गणेश मंडळ पदाधिकारी यांच्या सहकार्यातुन ,गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद निमित्य रक्तदान ,आरोग्य तपासणी आणि नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. सदर शिबीरामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथील रक्त पेढी चे डॉक्टर आणि समाजसेवा अधीक्षक श्री विक्रम लांजेवार आणि त्यांची चमुने रक्त संकलन केले तसेच वैद्यकीय तपासणी कार्यक्रमास THO मौदा डॉ श्री नंदेश्वर, वैद्यकीय अधिकारी डॉ समीक्षा महल्ले, डॉ सारिका राऊत आणि वैद्यकीय कर्मचारी, आशा वर्कर यांचे सहकार्य लाभले. एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्त दान केले, १५३ लोकांची वैद्यकीय तपासणी व नेत्र तपासणी करण्यात आली.


People Live
When People Give
Government Medical
College & Hospital Nagpur
MODEL BLOOD CENTRE






## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :— फिर्यादी नामे करण विनोंद नारनवरे, रा. बौध्द विहाराजवळ, नरखेड, जि. नागपुर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन नरखेड येथे अप क्र. ०१/२०२० कलम ३२६,३०२,२०१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत यप्रमाणे आहे की, दिनांक ३०/१२/२०२० रोजी २२:१५ ते २३:०० वाजेच्या सुमारास मौजा नरखेड येथील गजबे यांच्या किराणा दुकानासमोरील सिमेंट रोडवर फिर्यादीचे वडील मृतक नामे विनोद रमेश नारनवरे यांनी आरोपी नामे सिध्दार्थ माणिकराव कडबे, वय ३५ वर्षे, रा कुंभारपेठ, आंबेडकर नगर, नरखेड याला तु माझ्या पत्नी सोबत नेहमी नेहमी का बोलतो? अशी विचारणा केली असता आरोपीने मृतकाला सिमेंट रोडवर आपटुन, जबर मारहाण केल्याने मृतक हे उपचारादरम्यान मेडीकल कॉलेज, नागपुर येथे मरण पावले.

श्री मल्लिकाअर्जुन इंगळे, पोलीस निरीक्षक, नेम. पोलीस स्टेशन नरखेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ०३/०९/२०२५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश — ०१ श्री आर. एम. सादराणी यांनी नमुद आरोपी नामे सिध्दार्थ माणिकराव कडबे, वय ३५ वर्षे, रा कुंभारपेठ, आंबेडकर नगर, नरखेड **यास कलम ३०४ भादंवि मध्ये ५ वर्षे सश्रम कारावास व ५००/—रूपये दंड. दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री श्याम खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हिमांशु वंजारी, ब.नं १३४४ पो.स्टे. नरखेड यांनी मदत केली आहे

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०२/०८/२०२५ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना एक संशयीत पांढ—या रंगाचे पिकअप वाहन क्रमांक एम.एच ४० वाय २३७८ मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात पांढऱ्या रंगाचे ०२ बैल दिसुन आले बैलांना अंत्यत क्रूरतेने व निर्यदयतेने कोणत्याही प्रकारची चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करत असल्याचे दिसुन आले. चालकाला नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे चालक नामे परवेज युशुफ शेख, वय ३५ वर्षे, रा. कन्हान, ता. कामठी, जि. नागपुर आणि २) क्लिनर नामे निहाज सखिल कुरेशी, वय ४० वर्षे, रा. कामठी, ता. कामठी, जि नागपुर अशी माहीती समजली. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप वाहन क्रमांक एम. एच ४० वाय २३७८ किंमती २,००,०००/— रूपये. व २ बैल किंमती ४०,०००/— रूपयाचा एकुण किंमती २,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.

नमुद दोन्ही आरोपी यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ११ गुन्हे नोंद एकुण ५८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०२/०९/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ५८५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी विजय हरिभाउ मांढरे वय ६३ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ कुही ता. कुही जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे संजय रामदास ठाकरे वय ३२ वर्ष, रा पचखेडी, ता. कुही , २) विनायक सुर्यभन ठवकर, वय ४४ वर्ष, रा म्हसली पुर्नवसन, ता. कुही यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) शकिल सुलतान शेख, वय ४९ वर्ष, रा जिवन विकास शाळे, जवळ उमरेड आणि एक महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) प्रज्वल सिघ्दार्थ पकिडेश रा वार्ड क्र ०५, पााटणसावंगी, ता सावनेर,याचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे आरोपी अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा.नागलवाडी ता.सावनेर जि.नागपुर, याचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे गुणवंत शामराव दोडके, वय ३७ वर्ष, रा वार्ड क्र ११ मोवाड तह नरखेड याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे महीला आरोपीवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे पियुष अजित शेंडे, वय २३ वर्षे, रा. न्यु मार्केट कन्हान नगर परिषदच्या मागे, पिपरी कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे अनिकेत नरेश ईलावत, वय ३८ वर्ष, रा. प्रितमपुरा, नवी दिल्ली, ह. मु. शान ए पंजाब ढाबा, सोनेगाव लोधी ता. जि. नागपुर याचेवर गुन्हा नोंद आहे. अशा ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०२/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०३/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत वार्ड ४, बोरी, जुनी वस्ती, सातगाव, रिधोरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने